द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भ : एमएससीडीए/५७७/ २०२० २६ ऑक्टोबर २०२०

**श्री. अभिमन्युजी काळे**
आयुक्त - अन्न व औषध प्रशासन
महाराष्ट्र राज्य
**मुंबई**

**विषय : नोज मास्कच्या किमंती बाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्र. कोरोना-२०२०/प्र.क्र. ३०६/आरोग्य-५,दि.२० ऑक्टोबर २०२०**

**संदर्भ : महाराष्ट्र शासनाच्या वरील निर्णयास अनुसरुन औषध विक्रेत्यांकडे तपासणी करणेबाबत आपले परिपत्रक क्र. औषधे/४८३/२०२०/७० दि. २२.१०.२०२०**

महोदय,

अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र शासनाच्या आयुक्तपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्यातील ७५हजार औषध विक्रेत्यांच्या वतीने आपले मन:पुर्वक हार्दिक अभिनंदन !

आपल्या वरील संदर्भीय पत्र व विषयास अनुसरुन आपण सर्व संबंधित सह आयुक्त (औषधे)/ सहायक आयुक्त (औषधे) व औषध निरिक्षक यांना आपल्या कार्यक्षेत्रात नोज मास्कची विक्री शासनाने ठरविलेल्या किमंतीनुसार होते किंवा नाही याबाबत पडताळणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

आम्ही शासनाचे याबाबतीतील वरील संदर्भीय परिपत्रक व आपण यासंबधी दिलेले निर्देश याबाबत औषधी व्यावसायिकामध्ये तीव्र असंतोष असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने असे आदेश निर्गमित करतांना मास्क औषधी सदरात मोडतात अथवा नाही याचा विचार करण्यात आलेला नाही. शासन परिपत्रकातील प्रवर्गातील मास्कचे उत्पादक यांनी भरमसाठ नफा कमवून औषध विक्रेत्यास विक्री केलेल्या मालाचा मोठया प्रमाणात साठा विक्रेत्याकडे बाजारात उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत ज्या उत्पादकांनी भरमसाठ नफा कमवून खऱ्या अर्थाने ग्राहकाची लुट करण्यास प्रवृत्त केले त्यांना सोडून छोटासा व्यापार व छोटासा नफा कमवणाऱ्या औषधी विक्रेत्यास जर याचा नाहक परिणाम भोगावा लागणार असेल तर त्याबाबत योग्यती विचार होणे गरजेचे आहे.

आजममितिस बाजारामध्ये कापडी मास्कसह विविध प्रकारचे मास्क रस्त्यावर व कोणत्याही दुकानातून तसेच Allensolly, Van Heusen, Peter England या सारख्या बॅण्डेड कंपन्या कापडी मास्कची विक्री करुन ग्राहकांची लुट करित आहे. याकडे शासन व प्रशासन लक्ष देणार आहे काय ? औषध विक्रीचे अधिकृत परवाने घेऊन व्यापार करणे गुन्हा तर ठरत नाही ना? कारण परवाने धारकांना कायदेशीर रित्या व्यापार करित असतांना वेठीस धरल्यासारखे होत आहे. यापेक्षा दुकानातील मास्क दुकानासमीर हातगाडीवर ठेऊन विक्रि केल्यास त्यावर कोणताही कायदा लागू होणार नाही. तर औषध विक्रेत्यांने नेमके काय केले पाहिजे. आपण दिलेल्या निर्देशाची अमंलबजावणी करतांना औषध विक्रेत्यास वेठीस धरणे अथवा धमकावणे अथवा पैश्याची देवाण घेवाण करणे यासारखे प्रकार सुरु झाले आहेत. यावर संघटना तीव्र आक्षेप व्यक्त करते.

सदरहू बाबतीत नाहक तपासण्या करुन कोविड-१९ कोरोनाच्या साथीमध्ये आपला जीव धोक्यात घालून मागील सात महिन्यापेक्षा जास्त काळापासून औषधी पुरवठा सुरळित ठेवणाऱ्या औषध विक्रेत्याची अशा प्रकारे मानहानी होणार असेल तर या विरोधात संघटनेला योग्यती निर्णय घ्यावा लागेल. ज्यामुळे होणाऱ्या परिणामांची संपुर्ण जबाबदारी प्रशासनावर राहिल याची गांभीर्याने नोंद घ्यावी व कायद्याचे पालन करित औषधी व्यवसाय करुन सर्व सामान्य जनतेस सेवा देणाऱ्या औषधी विक्रेत्यास न्याय द्यावा हि विनंती.

आपण सदरहू बाबतीत दिलेले निर्देशांवर फेर विचार करुन योग्यते सुधारित निर्देष देऊन औषध विक्रेत्यास न्याय द्यावा.

आपला नम्र
**द महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**अनिल नावंदर**
**सचिव**